# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr. V. S. Irpate**
**Programme Coordinator (I/c.)**
**Ph. No. - 07132-223320**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW / 306 /2016** **Dt: 07/06/2016**

प्रति,

**मा. प्राचार्य**
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय : सन–२०१६ मधील पावसाळ्यात दि. ०१ ते ०७ जूलै, २०१६ या ''वन महोत्सव'' कालावधीत दि. ०१ जूलै, २०१६ या एकाच दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत.**

संदर्भ :– १) शासन निर्णय क्र. सावनि–२०१५/प्र.क्र. १३१/फ–११ मंत्रालय, मुंबई, दि. ३१ मार्च, २०१६.
२) पत्र क्र. गोंविग/कुसका/२६४९/२०१६ दि. ३०/०५/२०१६.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मापदंडानुसार भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन/वनीकरण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य हे देशातील प्रगतीशील आणि विकासामध्ये अग्रगण्य राज्य आहे. राज्यातील वृक्ष आवरणाचे प्रमाण सर्वसाधारणपणे २० टक्के आहे. जागतिक होत असलेली वाढ, वातावरणातील बदल, बदललेले निसर्ग आणि ऋतुचक्र, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी किंवा दुष्काळ या माध्यमातून गेल्या काही वर्षात निसर्ग आपल्याला जाणिव करुन देत आहे. पर्यावरणाचे असंतूलन, असमतोल, वाढते प्रदुषण आणि त्यातून होत असलेले पर्यावरणीय बदल हे यामागील महत्वाची कारणे आहेत. मानवी जिवनास या पर्यावरणीय बदलास सामोरे जावे लागत आहे.

वैश्विक उष्णतेमध्ये होणारी वाढ (Global Warming) हवामानातील बदल याबाबत जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात विचारमंथन सुरु झाले आहे. यांची तीव्रता व परिणामकारकता कमी करण्याचा भाग म्हणून शासनाचे विविध विभाग व जनतेच्या सहभागातून सन २०१६ मधील पावसाळयात **''वन महोत्सव''** कालावधीमध्ये दि. ०१ जूलै, २०१६ रोजी या एकाच दिवशी किमान २ कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्याचे शासनाने ठरविले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वृक्षाच्छादन वाढवून हरीत महाराष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी दुरगामी आणि प्रभाविपणे उपयोग होणार आहे.

या कार्यक्रमांतर्गत विभागाच्या यंत्रणेबरोबरच स्वयंसेवी व अशासकीय संस्था, खाजगी उद्योजक, उद्योजकता सामाजिक दायीत्व, सहकारी संस्था, विविध सामाजिक उपक्रमात अग्रेसर असणारी मंडळे व संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकप्रतिनिधी इत्यादिंचा लोकसहभाग घेण्याचे नियोजित आहे.

राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. आणि स्काऊट गाईड अंतर्गत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी आहे. हे विद्यार्थी वृक्षारोपन कार्यक्रमात अंमलबजावणी यंत्रणांना स्वयंसेवक म्हणून मदत करण्यास पूढे आल्यास सदर कार्यक्रम यशस्विपणे राबविण्यास मदत होईल. त्यातुन कोवळ्या व संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांना वृक्ष, वन, पर्यावरण, वन्यजिव, जैवविविधता , सामाजिक वनिकरण या क्षेत्राबाबत आस्था, प्रेम व जिव्हाळा निर्माण होईल त्यातून पर्यावरण सुरक्षितता, संरक्षण व संवर्धन यामध्ये मोलाची मदत होईल.

त्या अनुषंगाने, या कार्यक्रमांतर्गत वन व सामाजिक वनिकरण विभाग आणि महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ यांच्या मार्फत कमीतकमी १.५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट ठेवले आहे. उर्वरीत ५० लक्ष वृक्ष लागवड इतर विभागांमार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सहभाग आहे. यामध्ये विद्यापीठ, महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे परिसरात मोकळ्या जागेवर अनुक्रमे १००, ५० व २० रोपे लागवड करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे.

तरी कृपया प्रत्येक महाविद्यालयाने ५० रोपे खरेदी करुन महाविद्यालयीन परसिरामध्ये लावून सरद कार्यक्रम यशस्विरीत्या पार पाडण्यासाठी सहकार्य करावे. हि विनंती.

धन्यवाद!

संचालक (प्र.)
विद्यार्थी कल्याण विभाग
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

अधिक माहितीकरीता संपर्क : श्री बी. आर. काळे, जिल्हा कृषी अधिकारी, चंद्रपूर. मो. नं. ८८८८७९४१५१.